भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे

# त्रैमासिक

वर्ष : ९५ । अंक : १ ते ४ । शक : १९४१


THE
TRAVELS
OF
Monsieur de Thevenot
INTO THE
LEVANT.
In Three Parts.
VIZ. Into
I. TURKEY.
II. PERSIA.
III. The EAST-INDIES.
Newly done out of French.
Licensed, Decemb. 2. 1686.
RO. L'ESTRANGE.
LONDON,
Printed by H. Clark, for H. Faithorne, J. Adamson, C. Skegnes, and T. Newborough, Booksellers in St. Pauls Church-Yard, MDCLXXXVII.

'द ट्रॅव्हल्स ऑफ मस्य द तेवनो इन टू द लिव्हन्ट' हे भारत इतिहास संशोधक मंडळाच्या ग्रंथालयातील सर्वात जुने आणि दुर्मिळ पुस्तक, लंडनहून इ. स. १६८७ मध्ये छापून प्रकाशित झालेले तेवनोंचे इंग्रजी प्रवासवृत्त.

# QUARTERLY

BHARAT ITIHAS SAMSHODHAK MANDAL, PUNE
Vol. : 95 | No. : 1 – 4 | April 2018 – March 2019

ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001 *

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे
१३२१, सदाशिव पेठ, पुणे-४११ ०३०.  दूरध्वनी : ०२०-२४४७ २५८१

कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | - | डॉ. श्री. मा. भावे |
| उपाध्यक्ष | - | डॉ. वी. डी. कुलकर्णी |
| सचिव | - | श्री. पांडूरंग बलकवडे |
| खजिनदार | - | प्राचार्य नंदकुमार निकम |

सदस्य

(१) डॉ. अनुराधा कुलकर्णी
(२) डॉ. सर्जेराव भामरे
(३) डॉ. सदाशिवराव शिवदे°
(४) डॉ. चंद्रकांत अभंग
(५) डॉ. सचिन जोशी
(६) श्री. मंदार लवाटे
(७) श्री. संदीप तिखे

°डॉ. सदाशिवराव शिवदे यांचे दि. ७ एप्रिल २०१८ रोजी निधन झाले.

भारत इतिहास संशोधक मंडळ,
पुणे.

# त्रैमासिक

वर्ष : ९५

अंक १ ते ४

शक १९४१

Bharat Itihas Samshodhak Mandal,
Pune.

# QUARTERLY

Vol. 95

No. 1-4

April 2018 - March 2019.

प्रमुख संपादक
श्री. मा. भावे.

संपादक मंडळ
बी. डी. कुलकर्णी. चंद्रकांत अभंग. संदीप तिखे.

ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS • PUNE-411001

भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे
त्रैमासिक

प्रकाशक :
डॉ. श्री. मा. भावे.
अध्यक्ष, भा. इ. सं. मंडळ.
१३२१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३०.
इ-मेल - bismpune@gmall.com

प्रकाशन : जून २०१९

© भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
१३२१, सदाशिव पेठ, पुणे - ४११ ०३०.

अक्षर जुळणी व मुद्रक :
अपरांत
४१, गिरिजाधाम, राजेंद्रनगर,
पुणे - ४११०३०. फोन : ९४०३६०५७८३
इ-मेल - aprantbooks@gmail.com

मूल्य : रु. १८०/-

या नियतकालिकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विधानांची व मतांची जबाबदारी सर्वस्वी लेखकाकडे आहे. त्याचे उत्तरदायित्व मंडळाकडे नाही.

## - अनुक्रमणिका -

* संपादकीय – ५
* दि. १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ वार्षिक वृत्तान्त – ७
* ग्रंथालय अहवाल १.४.२०१८ ते ३१.३.२०१९ – १०
* १ एप्रिल २०१८ ते ३१ मार्च २०१९ या काळामधील देणगी तपशील – ११
* ग्रंथ देणगीदारांची यादी – १३
* इतिहासाचार्य राजवाडे स्मृति–व्याख्यान – १४
  पुण्यातील स्थित्यंतराचा काळ – पहिला कलेक्टर म्हणून रॉबर्टसन याची कारकीर्द (इ. स. १८१८–१८२९)
  *डॉ. संध्या पंडित.*
* सुमारे १०० वर्षापूर्वीचा लेख – २३
  परिंच्याचे जाधवराव
  *वा. सी. बेंद्रे.*
* श्रीस्थानक (ठाणे) येथील शिलाहारकालीन स्थापत्य – २९
  *डॉ. गुंजन गरुड.*
* रायगडावरील सिंहासनाची आणि इतर व्यवस्था – ३३
  *गोपाळ चांदोरकर.*
* तोतयावरील कोकण स्वारी–भिवरावाची रोजकिर्द (यावरून घेतलेला आढावा) – ४६
  *सौ. श्यामला दिलीप पानसे.*
* नारायण–चिंचोली मूर्ती समज–गैरसमज – ५०
  *अथर्व अनिल उत्पात.*
* परिंचे गावचा इतिहास – ५३
  *रामचंद्र वाघोले.*
* सुभेदार नेमणुकीच्या कागदपत्रांची वैशिष्ट्ये : प्रांत कल्याण भिवंडी – ७९
  *संदीप तिखे.*

ST. MIRA'S COLLEGE POONA-411001

Jayak
Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune.

### इतिहासाचार्य राजवाडे स्मृति-व्याख्यान

# पुण्यातील स्थित्यंतराचा काळ - पहिला कलेक्टर म्हणून रॉबर्टसन याची कारकीर्द (इ. स. १८१८-१८२९)

डॉ. संध्या पंडित

इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या स्मृतीला वंदन करून मी माझे व्याख्यान सुरू करते.

हे व्याख्यान अस्सल अप्रकाशित, प्रकाशित साधनांवर आधारित आहे. इ. स. १८१७-१८१८च्या तिसऱ्या इंग्रज-मराठा युद्धात खडकीच्या लढाईत मराठ्यांचा पराभव करून इंग्रजांनी पुण्यावर आपली सत्ता बसविली. पुणे हे पेशव्यांच्या सत्तेचा केंद्रबिंदू असल्यामुळे हा प्रांत इंग्रजांच्या हाती लागणे हे त्यांचे खूप मोठे यश ठरले.

जनरल वेलस्लीने १८०३ सालीच दुसऱ्या बाजीरावाची कृत्ये बघून ओळखले होते कि मराठा सत्तेचा ऱ्हास जवळ आला आहे.

पेशव्यांकडून हाती लागलेल्या प्रदेशाचे प्रशासन उरलेल्या भारतासारखे करणे शक्य नाही असे वाटल्यामुळे इंग्रजांनी त्याला मुंबई किंवा मद्रास इलाख्याशी न जोडता त्याच्यासाठी स्वतंत्र अशी 'डेक्कन कमिशनरेट'ची स्थापना केली. असा प्रयोग त्यांनी प्रथमच केला होता. भौगोलिकदृष्ट्या नाविन्य आणि वेगळेपणा असलेला आणि राजकीय महत्त्व असलेला हा प्रदेश संभाळणे हेसुद्धा इंग्रजांसाठी एक मोठे आव्हानच होते.

५०,००० चौरस मैल आणि ४ लाख लोकसंख्या असलेल्या प्रदेशाला इंग्रजांनी ४ कलेक्टोरेट - पूना (पुणे), अहमदनगर, खानदेश व धारवाड आणि पोलिटिकल एजंटच्या अमलाखालील सातारा राज्य असे विभाजित केले.

पुणे प्रांतावर कॅप्टन हेन्री डंडास रॉबर्टसन याची नियुक्ती करण्यात आली. पुणे कलेक्टोरेटचा भाग ५३५० चौरस मैल होता आणि त्याचे उपविभाग जुन्नर, खेड, मावळ, हवेली, शिरूर, पुरंदर, भीमथडी आणि इंदापूर असे होते. रॉबर्टसनच्या प्रशासनाखाली आलेला भाग हा भीमा आणि नीरा नदीच्या मधला होता. पुण्याची लोकसंख्या १,४०,००० इतकी होती. पुण्यातले हवामान युरोपियनांसाठी खूप सुखदायी होते असेही म्हटले गेले आहे.

ह्या डेक्कन कमिशनरेटचा कमिशनर म्हणून माउंटस्टुअर्ट एल्फिन्स्टन ह्याची नेमणूक केली होती. १८११ पासून एल्फिन्स्टन पुण्यात ब्रिटिश रेसिडेंट म्हणून रहात होता. पुण्यात राहिल्यामुळे त्याला मराठा देश, इथले लोक आणि त्यांच्या परंपरांची चांगलीच ओळख होती. पण जेव्हा येथे ब्रिटिश राजवट प्रस्थापित करण्याची वेळ आली तेव्हा त्याचे मत असे होते कि -

१) चांगले आणि स्थिर सरकार असणे म्हणजे फक्त चांगले नियम-कायदे असणे नव्हे तर ज्या प्रशासनात लोकांचा सक्रिय सहभाग असतो ते होय. (In a Letter to E. Strachey,



he expressed "It is not enough to give new laws, or even good courts you must take the people along with you & give them a share in your feelings, which can be done by sharing theirs.")

२) कायदे हे हळू-हळूच आणणे योग्य होय. मराठ्यांसाठी काय चांगले आहे हे कोणीच सांगू शकत नाही. त्याच्या मते येणारा काळच ब्रिटिशांना हे शिकवून जाईल.

३) पेशव्यांचे सरकार हे खूप व्यक्तिगत स्वरूपाचे होते (Personalised)- संस्थात्मक नव्हते - म्हणून त्याला जुन्या सरकारमध्ये रूजु असलेल्या अधिकाऱ्यांना राखून ठेवायचे होते. एल्फिन्स्टनच्या मते जे राष्ट्र जुन्या व्यवस्थेमध्ये भरभराटीचे होते, ती व्यवस्था वाईट असू शकत नाही.

४) म्हणून एल्फिन्स्टनने सुरुवातीला 'No Innovation'चे धोरण हाती घेतले.

नवीन सुधारणा आणण्यापेक्षा त्याने लोकांची मने जिंकणे व त्यांचा विश्वास संपादन करणे ह्याला जास्त महत्त्व दिले.

जशी जशी ब्रिटिशांची सत्ता प्रस्थापित झाली तसे त्यांनी 'Cautious Innovation' चे म्हणजे सावधपणे सुधारणा करणे असे धोरण स्वीकारले.

५) एवढे सगळे असताना एल्फिन्स्टनला ही खात्री होती की ब्रिटिशांना भारतातून वेगळे व्हावे लागेल कारण सुधारणा केल्याचा परिणाम हा वेगळे होण्यातूनच दिसतो.

He said - "It is better to have an early separation from a civilized people than a violent rupture with a barbarous nation."

म्हणूनच वेळेत वेगळे होणे हेच योग्य असते.

ह्याप्रमाणे एल्फिन्स्टनने त्याचे धोरण ठरवले :

१) १५० वर्षे स्वतंत्र असलेल्या लोकांवर ब्रिटिश सत्ता प्रस्थापित करणे.

२) ह्या प्रदेशात शांतता व सुव्यवस्था राखणे.

हे धोरण अंमलात आणण्यासाठी कलेक्टरांना त्याने काही सूचना केल्या. त्याप्रमाणे

१) मराठा सरदार ह्यांचा दर्जा आणि मान लक्षात घेऊन त्यांच्याशी वागणूक करावी.

२) सर्व सामान्य लोकांशी सुद्धा मिळून मिसळून वागलात तर आपल्याला राज्यकारभार करताना त्यांची मदत घेता येईल. म्हणून सारखे जेत्यांच्या भूमिकेतून येथील लोकांना तुच्छ लेखू नये असे सांगितले.

पुणे प्रांताचा कलेक्टर असलेल्या रॉबर्टसनचे ह्या प्रदेशातल्या लोकांबद्दलचे मत असे होते कि :-

१) साधारणपणे मराठे हे संकटात संयमी व सहनशील आहेत पण चेतविल्यावर तितकेच धीट व धाडसी पण आहेत आणि म्हणूनच त्यांना शूर व धाडसी म्हणणे योग्य आहे.

२) ते कृतज्ञ आहेत.

३) पण कोणी त्यांचा अपमान किंवा मानहानी केली तर त्याचा सूड घेतल्याशिवाय ते

St MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001 *

Jayak
Principal Incharge
St. Mira's College for Girls, Pune.

स्वस्थ बसत नाहीत.

४) घरगुती नात्यांमध्ये ते खूपच उदार व प्रेमळ आहेत.

५) घरातल्या महिलांचा घरावर मोठा प्रभाव असे.

६) मराठे हे खूप सौम्य आणि आनंदी लोक आहेत.

७) ते खूपच काटकसरीने राहत असले तरी त्यांच्यात चिकाटीपणा तेवढाच आहे आणि सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे सारखे फिरतीवर असणाऱ्या विनम्र लोकांमध्ये जितका मित्रत्त्वाचा भाव असेल तितका ह्या लोकांमध्ये आहे.

मराठ्यांबद्दल त्याने टीकाही केली आहे.

मराठे बाहेरच्या प्रदेशात गेले परंतु त्यांनी तेथील ज्ञान गोळा केले नाही किंवा तेथील कायदे कसे वापरतात हे जाणून घेतले नाही.

जोपर्यंत ते लष्करी विजय मिळवित होते तोपर्यंत ते सामर्थ्यवान होते. परंतु शेवटच्या काळात लष्करी कामगिरी करणे सुटले तेव्हा ते नुसत्या जुन्या विजयाच्या आठवणी काढत बसले.

ब्रिटिशांच्या हाती पुणे आल्यानंतर, इथल्या लोकांची भावना काय होती - ह्याचाही उल्लेख रॉबर्टसनने केला आहे.

१) जेव्हा रॉबर्टसनने शनिवारवाडा हाती घेतला तेव्हा त्याने लोकांना काहीही त्रास दिला नाही तरीसुद्धा लोकांची प्रतिक्रिया संमिश्र होती. ज्या लोकांना दुसऱ्या बाजीरावाच्या काळात कुठलाच त्रास झाला नव्हता ते ब्रिटिश राज्यावर नाखूष होते.

२) सुरुवातीला काही लोकांची मते ब्रिटिशांच्या अतिशय विरोधात होती. त्यांची खात्री होती की मराठे सरदार ब्रिटिशांना पळवून लावतील आणि सहाजिकच असले काही न घडल्यामुळे काही काळासाटी ते निराश व दुःखी होते.

३) रॉबर्टसन पुढे सर्वात मोठे आव्हान हेच होते की लोकांना ब्रिटिशांच्या राज्याबद्दल पटवून देऊन शांत करणे.

४) एक महिन्यानंतर पुण्यातले लोक त्रयस्थासारखे वागायला लागले - ना बाजीरावाचे समर्थक, ना इंग्रजांचे.

५) आणि जेव्हा लोकांना ही खात्री पटली कि ब्रिटिश त्यांच्या राज्यावर कायम राहणार आहेत-तेव्हा समाजातले आदरणीय आणि समजुतदार लोक रॉबर्टसनला निर्धास्तपणे रात्रीऐवजी दिवसा भेटू लागले.

काही वर्षांनी काही ब्राह्मणांनी त्यांचा विरोध केला होता पण सर्वसामान्य लोकांनी बहुतांशी ब्रिटिशांचे राज्य मान्य केले होते.

लोकांच्या अशा प्रकारच्या संमिश्र भावना लक्षात घेऊनच रॉबर्टसनला ब्रिटिश प्रशासनाचा पाया मजबूत करावा लागणार होता.



पुण्यात शासन करण्याची संधी मिळणे ही एक मानाची गोष्ट होती. सर्वसामान्य लोकांच्या मनात ही भावना होती कि 'जो पुण्यावर राज्य करतो तो जगावर राज्य करतो.' आणि म्हणूनच रॉबर्टसनच्या मते पुण्यातल्या लोकांना समाधानी ठेवणे महत्त्वाचे आणि गरजेचे होते.

रॉबर्टसनने लोकांची मने कशी जिंकली किंवा इंग्रज राज्यकर्त्यांचे हेतू चांगले आहेत हे कसे पटवून दिले हे काही उदाहरणांवरून आपल्याला कळून येते.

१) गावांमधील जास्तीचे कर रद्द केले. मावळमध्ये रयत गरीब होती आणि आधीच करांच्या ओझ्याखाली दबलेली होती. त्यांच्यावरील ओझे कमी करण्यासाठी काही कर त्याने रद्द केले.

२) जे गाव सोडून गेले होते त्या गावांना परत वसविण्यासाठी गावकऱ्यांना सवलती दिल्या जेणेकरून वसती वाढेल आणि काम असल्यामुळे लोक लूटमार करणार नाहीत आणि त्या भागात सुव्यवस्था प्रस्थापित करता येईल.

३) भवानी पेठेतल्या वाण्यांनी पेशव्यांकडून कर्ज घेतले होते. हे कर्ज त्यांनी स्वतःला प्रस्थापित करण्यासाठी व पुण्याची समृद्धि वाढविण्यासाठी घेतले होते. पैसे परत केल्यानंतर कर्जातली फक्त रू. २,२६४-३-८२ ही रक्कम फेडायची बाकी होती. जर ही रक्कम वसूल करण्याचे ब्रिटिशांनी ठरविले असते तर ते ह्या वाण्यांना परत करणे कठिण ठरले नसते. त्याचे कारण म्हणजे १०३ वाण्यांनी मिळून ही रक्कम परत केली असती आणि त्यांच्यापैकी कुणावर सुद्धा भार पडला नसता. पण रॉबर्टसनच्या मते जर ब्रिटिशांनी ह्या कर्जाची रक्कम माफ केली तर - 'This would gain more popularity than to be acquired by spending ten times the amount.' त्याच्या मते ही रक्कम परत न घेऊन ब्रिटिशांचे फार नुकसान होणार नाही परंतु लोकांमधला एक मोठा वर्ग ब्रिटिशांच्या बाजूने होईल आणि वेळ पडल्यास त्यांना भविष्यामध्ये मदत पण करेल.

४) लोणी व कोंडापूरच्या गावकऱ्यांना गावाला दारे लावण्यासाठी लाकूड हवे होते. त्या भागातले जे सरकारी कुरण होते, तेथे योग्य दर्जाचे लाकूड उपलब्ध नव्हते. म्हणून ह्या लोकांनी रॉबर्टसनकडे विनंती केली. रॉबर्टसनने त्यांची मदत करण्यासाठी कमिशनर साहेबांकडे परवानगी मागितली कि सरकारी कचेरी बांधण्यासाठी जे जास्तीचे लाकूड शिल्लक होते व त्या इंजिनिअरला न लागणारे होते ते त्याने ह्या गावाच्या लोकांना लाकडी दार बांधण्यासाठी द्यावे. त्याचे कारण असे कि खडकीच्या लढाईत हे लोक ब्रिटिश सैनिकांबरोबर खूप चांगले वागले होते आणि म्हणून जे दुःख ह्या लोकांनी सोसले आहे त्याच्या समोर ह्यांची मागणी खूपच क्षुल्लक होती.

५) पेशव्यांनी हिराबागेत पर्वती तलावात गणेशाचे मंदिर उभारले होते. त्या देवळात भक्तांना एका छोट्याश्या बोटीत न्यावे लागायचे. ही बोट जुनी झाल्याने त्याची दुरुस्ती करणे भाग होते. पण ह्या बोटीच्या डागडुजीचा खर्च नवीन बोटीच्या अर्ध्या खर्चापेक्षा जास्त होता.

St. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA 411001 *

म्हणून रॉबर्टसनने एक नवीन बोट घेण्याचे कमिशनर साहेबांना सुचविले. असे केल्याने लोकांच्या मनात ब्रिटिशांच्या प्रति चांगली भावना निर्माण करण्यासाठी मदत होऊ शकेल.

६) पुण्याच्या लोकांच्या भावनेला इजा न करणे कारण तसे केल्यास लोकांचा इंग्रज राजवटीवरचा विश्वास उडेल यासाठी काही नियम करण्यात आले.

१. गोमांस (Beef) हे फक्त कॅम्पमध्ये युरोपियन शिपायांसाठी उपलब्ध असेल.

२. परवानगीशिवाय कोणताही इंग्रज शिपाई शहर परिसरात दिसता कामा नये.

३. कोणत्याही युरोपियन व्यक्तिला शहरात राहण्याची परवानगी नव्हती.

ही सगळी होती ब्रिटिशांनी प्रयत्न केल्याची उदाहरणे जेणे करुन ते पुण्यातल्या लोकांच्या मनामध्ये त्यांच्या राजवटी प्रति एक समाधानाची भावना निर्माण करू शकले होते.

पण जेव्हा दुसऱ्या बाजीराव पेशव्याने घेतलेले कर्ज परत न केल्याची बाब समोर आली आणि हे कर्ज आता ब्रिटिशंनी फेडावे अशी अपेक्षा दिसू लागली तेव्हा ब्रिटिशांनी वेगळे धोरण स्वीकारले.

ब्रिटिशांच्या मते :-

१. ब्रिटिश सरकारला बाजारावाचे कर्ज फेडणे न्यायाप्रमाणेसुद्धा बंधनकारक नाही.

२. तसेच त्यांचे म्हणणे असे होते कि बाजीराव दुसरा हा नेहमी आपले कर्ज वेळेवर फेडत असे.

म्हणून त्यांच्या सरकारवर आधीच्या राज्याची कर्ज फेडण्याची वेळ येणारच नाही आणि जो कुणी असा दावा करेल तो खोटा असणार असे म्हणून अत्यंत हुशारीने ब्रिटिशांनी पैसे देणे टाळले.

### सामाजिक बाबी

ब्रिटिश समाजापेक्षा येथील समाज भिन्न होता. त्यांच्या प्रथा, चालीरीती अगदी वेगळ्या होत्या. सामाजिक प्रश्नांबाबत धोरण ठरवण्यामागे ब्रिटिश अधिकाऱ्यांचे विचार असे होते कि :

१) लोक परिवर्तनासाठी तयार होईपर्यंत हळूहळू बदल करणे.

२) हा बदल स्वतः लोकांनी स्वेच्छेनी केला पाहिजे.

### सतीची प्रथा

याबाबत ब्रिटिशांनी विशिष्ट धोरण स्वीकारले होते. त्याप्रमाणे विधवांनी सती जाऊ नये यासाठी त्यांचे फक्त मन वळवण्याची परवानगी होती. तसेच सती प्रथेची बंदी भारतीयांनी स्वतः केली पाहिजे. ब्रिटिशांची प्राथमिकता त्यांचे राज्य स्थिर करण्याची होती. त्यांना असे वाटले कि आता सती प्रथा पूर्णपणे बंद केली आणि ती अयशस्वी झाली तर भविष्यात ती



कधीच बंद करता येणार नाही.

सती प्रथेत विधवा तिच्या निर्णयाने सती जात असताना परत फिरु शकत नव्हती. ती तसे करु लागल्यास तिला जबरदस्तीने चितेमध्ये ढकलले जात असे. त्यातूनही ती वाचली तर तिला समाजात मान मिळत नसे व तिला जातीतून बहिष्कृत केले जात असे. समाजात अशीही अंधश्रद्धा होती कि कुठल्याही विधवेने असे केल्यास पूर्ण गावावर अरिष्ट येते.

सती जाण्याला काही आर्थिक कारणे होती. विधवा म्हणून आयुष्य जगणे त्या काळात खूप कठिण होते. त्याच्या पेक्षा सती गेलेले बरे असे तिला वाटे. आर्थिकदृष्ट्या दुसऱ्यांवर अवलंबून असल्यामुळे तिची जबाबदारी घ्यायला कोणीच तयार नसे. अशा अवस्थेत तिच्या मनावर झालेल्या परिणामामुळे ती हा निर्णय बहुतांशवेळा घाईने व विचार न करता घेत असे.

ब्रिटिशांना ही प्रथा अगदी न पटणारी, निर्दयी आणि विवेकशून्य अशी वाटत होती. रॉबर्टसनने याच्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न केला. ज्या गरीब विधवांना आर्थिक मदत करून सती जाण्यापासून परावृत्त करता आले त्यासाठी त्याने अतोनात प्रयत्न केले व ते बऱ्याच प्रमाणावर यशस्वी ठरले.

परंतु १८२३ मध्ये एका विधवेच्या अयशस्वी प्रयत्नामुळे रॉबर्टसनला मोठा धक्का बसला. राधाबाई म्हसकर, ही विधवा सती जाण्यास चितेवर चढल्यावर, आगीचे चटके बसल्यामुळे तिचा धीर खचला व तिने स्वतःचा जीव वाचवण्याचा प्रयत्न केला. अशा वेळी उभ्या असलेल्या समुदायाने तिला जबरदस्तीने सती जाण्यास भाग पाडले. ज्यामुळे तिचा मृत्यू झाला-पण सती म्हणून नव्हे तर, झालेल्या जखमांमुळे दुसऱ्या दिवशी दवाखान्यात झाला.

हे सगळे बघितल्यावर एक अधिकारी म्हणून रॉबर्टसन खूप अस्वस्थ झाला व त्याने अशी घटना परत होऊ नये म्हणून पुण्यातल्या शास्त्र्यांची सभा बोलावली व त्यांच्याशी शास्त्रांचा स्वतः सखोल अभ्यास करून चर्चा केली. ह्या सभेत त्याने शास्त्रांमध्ये लिहिल्याप्रमाणे सती जाण्याची पद्धत पाळावी असे बजाविले. असे न केल्यास व विधवांवर जबरदस्ती केल्यास त्यांना खूनी मानण्यात येईल असेही बजाविले.

ह्या नंतरच्या दक्षिणा वाटण्याच्या प्रसंगी उपस्थित असलेल्या शास्त्र्यांबरोबरसुद्धा त्याने योग्य पद्धतीची चर्चा केली व ती ऐकून त्या विद्वान शास्त्र्यांनी सुद्धा त्याने येथील स्त्रियांना वाचविण्यासाठी घेतलेल्या कष्टांचे कौतुक केले. त्या शास्त्र्यांनीसुद्धा कबूल केले की त्यांनी स्वतः सुद्धा शास्त्रात दिलेली पद्धत जाणून घेण्यासाठी इतके कष्ट कधीच घेतले नसते.

अशा सततच्या प्रयत्नांमुळे नंतरच्या काळात सती जाण्याचे प्रमाण कमी झाले.

सती बंदीचा कायदा १८२९ मध्ये झाला. परंतु त्यापूर्वीच्या काळात रॉबर्टसनने येथे सती बंदीसाठी केलेले कार्य वाखाणण्याजोगे आहे.

### धर्मासंबंधी धोरण

ब्रिटिश सरकारने धार्मिक संस्थांना आधी जसे पैसे देत असत तसेच देत राहावे असे

ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA-411001 *

नमूद केले. पुण्यात रॉबर्टसनला तिथल्या देवस्थानांचा वार्षिक खर्च रू. २७,०००चे कमी करून रू. २०,००० करण्यास सांगितले. पण रॉबर्टसनच्या मते असे करण्याचे परिणाम खूप धोकादायक असू शकतात. तो म्हणतो कि, काही हजार रूपयांसाठी बाजीरावाच्या परतीची शक्यता खूप जास्त प्रमाणावर असू शकते म्हणून असे करणे योग्य नव्हे.

पुण्यातल्या लोकांच्या भावनांची जाणीव ठेवून त्याने सिंहगडावर सापडलेल्या पर्वती मंदिरातल्या देवांच्या मूर्ती परत मंदिरात द्यायचे ठरविले. ह्याने रॉबर्टसनने पुण्यातल्या लोकांच्या मनामध्ये आपले स्थान निर्माण करण्याचे प्रयत्न केले.

पुण्यात अधिकारी म्हणून नेमल्यामुळे रॉबर्टसनच्या हाती मोठी कामगिरी होती. येथल्या लोकांना आपलेसे करण्याचे त्याने प्रयत्न केले. होळी निमित्ताने त्याने पुण्यातल्या नामवंत लोकांना आमंत्रित केले व स्वखर्चातून त्यांचे मान-पान व मनोरंजनही केले. त्या काळात त्याला हा खर्च रू. ३३१/- असा पडला.

ब्रिटिशांना ह्या प्रांतातल्या रीतीरिवाज आणि सणांसाठीचे खर्च सुरु ठेवण्यास हरकत नव्हती. उदाहरणार्थ :

१) शिवरात्री उत्सवासाठी रू. २००० मंजूर करण्यात आले.

२) बेलबागेतल्या विष्णूच्या मूर्तीचा मुकुट दुरुस्त करण्यात आला आणि त्याचे दागिने परत देण्यात आले.

३) तुळशीबागेतल्या रामाला वस्त्रे देण्यात आली.

दुष्काळाच्या वेळी लोक महादेव पाण्यात बुडवून ठेवत असत. रॉबर्टसनच्या काळात दुष्काळ पडला असताना त्याने लोकांना महादेवाला पाण्यात ठेवण्याची परवानगी दिली. योगायोगाने पाऊस पडला आणि त्यामुळे लोकांना आनंद होऊन त्यांना हे सरकार उदार आहे असे वाटू लागले.

काही लोक ख्रिश्चन धर्माचा प्रसार करण्यासाठी त्या धर्माची पुस्तके वाटत होते. त्यावेळी रॉबर्टसनने त्या लोकांना अटक केली कारण नाहीतर लोकांचा गैरसमज झाला असता की, हे लोक सरकारनेच पाठविले आहेत.

### दक्षिणा

पेशव्यांच्या काळात पुण्यामध्ये श्रावण महिन्यात ब्राह्मणांना त्यांच्या ज्ञानानुसार दक्षिणा दिली जात असे. ब्रिटिशांनी ह्याचे स्वरूप बदलून त्याच्या ऐवजी हिंदू धर्माच्या शिक्षणाला उत्तेजन देण्याचे धोरण स्वीकारले. आधीची पद्धत त्याने कमी करून त्यातील पैशातून हिंदू कॉलेज स्थापन केले. ह्या कॉलेजमध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना दक्षिणा देण्यास सुरुवात केली.

### शिक्षण

ह्या प्रांतातील समाज तर्कशुद्ध विचार करणारा तसेच उदारमतवादी व्हावा म्हणून

ST. MIRA'S COLLEGE FOR GIRLS * POONA 411001 *



ब्रिटिशांनी पाश्चात्त्य पद्धतीचे कला आणि विज्ञान यांचे शिक्षण द्यावे असे ठरविले. त्याप्रमाणे इ. स. १८२१ मध्ये हिंदू कॉलेज सुरू झाले. त्यामध्ये हिंदू शास्त्रांबरोबरच कायदा, गणित ह्यासारखे विषयही शिकविले जात. हे कॉलेज विश्रामबागवाड्यात सुरु करण्यात आले आणि नंतर १८६४ मध्ये त्याचे रूपांतर डेक्कन कॉलेजमध्ये झाले. ह्या कॉलेजचे पहिले प्रिन्सिपल म्हणून राघोबा आचार्य रामानुज ह्यांना नेमण्यात आले.

### मद्यविक्री

मद्यविक्रीची दुकाने उघडण्यासाठी पुणे शहरात तसेच आसपासच्या अर्धा मैल परिसरात ब्रिटिशांनी परवानगी दिली नव्हती. जी दुकाने होती ती रात्री ८ वाजता बंद करणे बंधनकारक होते. रॉबर्टसनच्या मते पुणे शहरातील लोकांना मद्य पिण्याची सवय नव्हती. त्याच्या मते पुण्यातील लोक अधिक नीतीमान होते आणि त्यामुळे सरकारचा महसूल वाढावा ह्यासाठी मद्यविक्रीची दुकाने सुरू करणे योग्य नव्हते. पुण्यातल्या लोकांबद्दल रॉबर्टसन खात्रीने म्हणतो - 'I can certainly say that a majority of this district, if they had the option of drinking a dram, or refusing it, would rather not take it'.

### आर्थिक बाबी व व्यवस्था

१) विक्री व मालमत्ता हस्तांतरणावरचे कर - रॉबर्टसनच्या प्रमाणे मालमत्ता, विक्री किंवा हस्तांतरणावर कर लागू करणे योग्य नव्हते. त्याच्या शब्दात सांगायचे झाले म्हणजे, 'This was because such a tax increased the revenue of the Sovereign at the expence of the Capital of the people' सोप्या शब्दात सांगायचे झाले म्हणजे लोकांच्या भांडवलातून अशा कराने सरकारचा महसूल वाढेल आणि रॉबर्टसन प्रमाणे हे योग्य नव्हते. दुसरे कारण म्हणजे हे कर नेहमी मालमत्ता विकणारा भरत असे. कारण मालमत्ता विकणाऱ्यांची गरज मालमत्ता विकत घेणाऱ्यापेक्षा जास्त असते आणि रॉबर्टसनच्या मते अशा पट्टीचा भार बहुतांश वेळी एका गरजू व्यक्तिलाच सोसावा लागतो. म्हणून ब्रिटिश अधिकारी असूनसुद्धा त्याला असे कर अयोग्य वाटले.

२) स्टॅम्प कर - १८२१-२२-जरी या करामुळे सरकारला उत्पन्न मिळाले असते तरीही हे कर रॉबर्टसनला लोकांना फसवण्यासाठी आकारलेली एक योजना वाटे. हे कर न्याय पद्धतीत व कायदेशीर व्यवस्थापनेमध्ये आणले होते. हे कर लावल्यामुळे लोकांना आपली तक्रार सखोल लिहिण्यास संकोच वाटत असे. कारण सारखे त्यांच्या मनात त्यावर होणाऱ्या खर्चाचा विचार असे.

रॉबर्टसनच्या मते तक्रार करणाऱ्या व्यक्तिला आपली तक्रार विनाखर्च सखोल माहिती देऊन लिहिण्याने जे एक समाधान प्राप्त होते त्याच्यावर ह्या करामुळे अतिक्रमण केल्यासारखे होते आहे. नवीन आणि वेगळा कर असल्यामुळे लोकांना तो जुलमी वाटू शकतो.

रॉबर्टसनला खात्री होती कि लोक माहित असलेला 'हरकी' कर २५% भरायला तयार असतील पण २% कर अशा रीतीने भरणे त्यांना मंजूर नसेल.

**समारोप –**

इंग्रज जिल्हाधिकारी म्हणून मूल्यमापन करताना आपल्याला हे नोंदवावे लागेल कि रॉबर्टसन, एल्फिन्स्टन यांच्यासारख्या उदारमतवादी आणि भारतीयांप्रती सहानुभूती असलेल्या अधिकाऱ्यांमुळेच इंग्रजी राजवटीचा पाया भक्कम होऊन ती स्थिरावली. १५० वर्षे संपूर्ण स्वातंत्र्यात असलेल्या लोकांशी जुळवून घेऊन त्यांना शांत ठेवणे हे कठीण काम त्याने केले. त्यामध्ये त्याला कधी कधी वरिष्ठांबरोबर संघर्षही करावा लागला. त्यामध्ये त्याला कधी यश तर कधी अपयश आले. परंतु येथील इंग्रजी राजवट पक्की करण्यामागे त्याचा मोठाच सहभाग होता.

रॉबर्टसनचे मूल्यमापन करताना त्याच्याच अमलाखाली असलेल्या लोकांची त्याच्याबद्दलची भावना त्याचे खरे यश ठरविते. त्याची पुण्यातून बदली झाली तेव्हां पुण्यातील १३०० हून अधिक लोकांनी त्याला एक Memorandum दिला. त्यामधून तत्कालीन लोकांची त्याच्याबद्दलची भावना कळते.

"This Memorandum is presented to Captain Henry Dundas Robertson who from the first establishment of the Company's Government in Poona discharged for seven years the duties of Judge and also from the same time until now the duties of Collector and Magistrate, as a token of remembrance on the part of the undersigned of their sense of the manner in which he has maintained their respectability, and given to all according to their degree, due consideration, whereby he has highly gratified every one. When the Company's Sircar was first introduced the people were ignorant of its principles, and customs; but he, by the wisdom he displayed, effected the objects of his Government at the same time that he allowed no one to be treated with injustice or disrespect - Now he being removed from his offices here, in order to fill a higher situation, he may feel gratification, but that we might assure him that his kindness to us will ever remain fresh in our recollection, we have great pleasure in presenting this Memorandum, to remain by him, in remembrance of our sentiments towards him."

❖❖❖❖

**Select Bibliography**
1. Deccan Commissioner's Files, Peshwa Dafter Pune.
2. European Manuscripts, India Office Library, London.
3. Various Department Volumes for the period AD1818 to 1838, Maharashtra State Archives, Mumbai.
4. Choksey, R. D., The Aftermath (1818-1826), Bombay; 1950.

POONA * ST. MIRA'S COLLEGE

## सुमारे १०० वर्षांपूर्वीचा लेख
## परिंच्याचे जाधवराव


वा. सी. बेंद्रे

मला. रा. रा. आबासाहेब गोविंदराव जाधव पाटील, परिंचे, यांनी तारीख १७ रोजी ५ अस्सल सनदा व १ आज्ञापत्र असे कागद पहावयास दिले व त्यांची नक्कल ही करून घेण्यास परवानगी दिली. रा. रा. आबासाहेब जाधव हे स्वतः संमेलनास हजर राहून अस्सल कागद दाखविणार होते. परंतु, त्यांना तसे करतां आलें नाहीं व अस्सल सनदा ह्या त्यांचे चालू वतनाबद्दलचे अस्सल पुरावे असल्याकारणाने व त्यांचे घराण्यात आपापसांत भाऊबंदकीचे दिवाणी खटले चालू असल्याकारणानें त्यांचेजवळ असलेल्या अस्सल प्रती ते दुसरे कोणाजवळ देण्यास नाखुष दिसले म्हणून मीहि त्यांचे जवळ फारसा आग्रह धरला नाही. ह्या ६ अस्सल पत्रांपैकी ४ शाहु महाराजांनी दिलेल्या सनदा इनाम कमिशनमध्ये नोंदल्या गेल्या असून तसे शिक्केहि त्यांवर आहेत. त्यांचे घराण्याची अर्धीमुर्धी एक वंशावळहि त्यांनी दाखविली व त्याची मी नक्कल करून सोबत जोडली आहे. ही वंशावळ म्हणजे म्हणजे इनाम कमिशन कडून रा. रा. गोविंदराव म्हणजे आबासाहेब यांचे वडील यांचे अर्जावरून देण्यांत आली आहे. रा. रा. आबासाहेब जाधव व त्यांचे पुतणे बाळासाहेब जाधव यांचे जवळ बरींच जुनीं कागदपत्रें आहेत परंतु एकदां स्वतः परिंचे मुकामीं गेल्याशिवाय तीं हातास लागतील असें वाटत नाही. असो; आतां आपणांस मी उतरून घेतलेल्या नकला वाचून दाखवितों.

८ वंशज नांदनज येथें. ९ सांघारेस गेले, १० यांनी २७ शिवाजी हा दत्तक घेतला. ११ घार येथें (निंबंधलेखक) १२ शंकराज २५ यांस दत्तक

श्री

स्वस्ति श्री राज्याभिषेक शके १९ अंगारानाम संवत्सरे माघवदि अष्टमी भृगुवासरे क्षत्रीयकुलवतंस श्री राजाराम छत्रपति यांणी देशाधिकारी व लेखक वर्तमान व भावी सुभा प्रांत




सातारा यांस आज्ञा केली यैसीजे गणोजी बिन बाळाजी जाधव ये विशाई राजश्री संताजी घोरपडे सेनापती याणी चंदीचे मुकामी सनिध येऊन विनंती केली यैसी जे गणोजी बिन बाळाजी जाधव यांनी स्वामीचे पायापासी येऊन येकनिष्ठता धरून देसीहून कर्नाटक प्रांतास चंदीस येऊन येकभावे सेवा केली ती यांस येक गाव नुतन इनाम करून घ्यावयास पाहिजे म्हणून विदित केले. त्यावरून त्याचवरी कृपाळु होऊन मौजे कुसवडे...... प्रांत सातारा हा गांव नुतन इनाम करून देहे १ येकरास कुलबाब कुलकानु हलीपटी व पेस्तरपटी सहित हक्कदार